क्र.१६३(१)/२०१९/१४-ब                                                        दिनांक :- ०३ ऑगस्ट, २०१९

# महाराष्ट्र वनसेवा (पूर्व) परीक्षा-२०१९

## घोषणा

## जाहिरात क्रमांक (०४/२०१९)

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दिनांक २६ मे, २०१९ रोजी घेण्यात आलेल्या महाराष्ट्र वनसेवा (पूर्व) परीक्षा-२०१९ चा निकाल दिनांक **०३ ऑगस्ट, २०१९** रोजी जाहीर करण्यात आला आहे. सदर पूर्व परीक्षेत अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांच्या बैठक क्रमांकाची यादी व गुणांची सीमारेषा आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

**२. प्रस्तुत पूर्व परीक्षेसाठी उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने केलेल्या अर्जात दिलेल्या माहितीच्या आधारे, त्यांची पात्रता तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून, पूर्व परीक्षेच्या निकालाआधारे मुख्य परीक्षेस पात्र ठरलेल्या उमेदवारांपैकी विहित कालावधीत मुख्य परीक्षेसाठी अर्ज करणा-या व परीक्षा शुल्क भरणा-या अर्हताप्राप्त उमेदवारांनाच मुख्य परीक्षेस प्रवेश देण्यात येईल. अशा तपासणीनुसार अपात्र ठरणाऱ्या उमेदवारांची उमेदवारी आयोगाकडून कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.**

**३. मुख्य परीक्षा दिनांक १५ सप्टेंबर, २०१९ रोजी घेण्यात येईल.**

**४.** प्रस्तुत निकालाआधारे महाराष्ट्र वन सेवा (मुख्य) परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या व अर्जात प्राविण्यप्राप्त खेळाडूचा दावा केलेल्या उमेदवारांनी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक १ जुलै, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार व त्यास अनुसरुन प्रसिध्द करण्यात आलेल्या दिनांक १८ ऑगस्ट, २०१६ रोजीचे शुध्दीपत्रक व दिनांक ११ मार्च, २०१९ रोजीचे शुध्दीपत्रक व तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार विषयांकित गट - 'अ' व 'ब' पदांसाठी निश्चित केलेली क्रीडा विषयक अर्हता धारण करीत असल्याबाबत , पूर्व परीक्षेचा अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांकाचे म्हणजेच दिनांक २८ मार्च, २०१९ रोजीचे किंवा तत्पूर्वीचे क्रीडा प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. तसेच परीक्षेचा अर्ज भरण्याच्या अंतिम दिनांकापूर्वीची संबंधित उपसंचालक , क्रीडा व युवक सेवा यांचेकडे प्रमाणपत्र पडताळणीसाठी अर्ज सादर करणे व त्या संदर्भातील पोचपावती सादर करणे बंधनकारक आहे. तसेच खेळाडू उमेदवारांनी त्यांच्या क्रीडाविषयक प्रमाणपत्राचा, संबंधित विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांनी प्रमाणित केलेला क्रीडा प्रमाणपत्र पात्रतेचा अहवाल मुलाखतीच्या वेळी सादर करणे बंधनकारक आहे.

**५.** प्रस्तुत परीक्षेचा निकाल समांतर आरक्षणाच्या व अन्य मुद्यांसदर्भात विविध मा. न्यायालयात/ मा.न्यायाधिकरणात दाखल करण्यात आलेल्या न्यायिक प्रकरणातील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून प्रसिध्द करण्यात आला आहे.

**६.** बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ अंतर्गत शासकीय/स्वयंसेवी बालगृहात दाखल होणा-या अनाथ मुलांना त्यांच्या संस्थेतील कालावधी संपल्यावर संस्थेच्या बाहेर पडल्यानंतर अनेक समस्यांना तोंड द्यावे

लागते. अशा अनाथ मुलांना राज्य शासनाच्या विविध सवलतींचा लाभ घेता यावा याकरीता शासनाच्या महिला व बालविकास विभागाने शा.नि.क्र.अमुजा२०११/प्र.क्र.२१२/का-३, दि. ०२ एप्रिल, २०१८ अन्वये शिक्षण व नोकरी यामध्ये १% आरक्षण लागू केले आहे. शासन मागणीपत्रानुसार प्रस्तुत पदाच्या जाहीरातीत अनाथ मुलांसाठी आरक्षण विज्ञापित करण्यात आले आहे. तद्अनुषंगाने शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१३/प्र.क्र.१०९/का-३, दि. ०६ जून, २०१६ अन्वये विहित केलेल्या अटी व शर्ती नुसार सक्षम प्राधिका-यांनी दिलेले विहित नमुन्यातील "अनाथ असल्याचे प्रमाणपत्र" मुलाखतीच्या वेळी सादर करणे बंधनकारक आहे.

**७.** आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील (ईडब्ल्यूएस) उमेदवारांकरीता शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक १२ फेब्रुवारी, २०१९ अन्वये विहित करण्यात आलेले प्रमाणपत्र, कागदपत्र मुलाखतीच्या वेळी सादर करणे बंधनकारक आहे.

**८.** प्रस्तुत पूर्व परीक्षेच्या निकालाच्या आधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना त्यांनी अर्जात नमूद केलेल्या मोबाईल क्रमांकावर एसएमएसव्दारे कळविण्यात येईल. त्यावेळी उमेदवाराने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी ऑनलाईन पध्दतीने आवश्यक माहिती व परीक्षा शुल्क विहित मुदतीत विहित पध्दतीने सादर करणे आवश्यक राहील. त्याशिवाय उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येणार नाही. तसेच, पूर्व परीक्षेसाठी सादर केलेल्या अर्जातील दावेच मुख्य परीक्षेकरिता स्विकारार्ह ठरतील.

**ठिकाण:- मुंबई**
**दिनांक:- ०३ ऑगस्ट, २०१९**

उपसचिव (परीक्षा-१)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.मुंबई